**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील मागासवर्गीय अनुशेषाची पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | सामाजिक प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० टक्के | माजीसैनिक १५ टक्के | भूकंपग्रस्त २ टक्के | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | सहा.मु.का.अ./सहा.ले.व ले.प.अ/ जि.ग्रा.अधिकारी (गट - ब) (वेतन संरचना रु.९३००-३४८००ग्रेड पे रु.४४००) | | | | | | |
| | १) अनुसूचित जमाती | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | २) विमुक्त जाती -अ | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | ३) इतर मागास वर्ग | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ३ | १ | ० | ० | ० | २ |
| (२) | लघुलेखक (गट - क) (वेतन संरचना रु.९३००-३४८००ग्रेड पे रु.४३००) | | | | | | |
| | १) अनुसूचित जाती | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | १ |
| (३) | लघुटंकलेखक (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२००ग्रेड पे रु.२४००) | | | | | | |
| | १) अनुसूचीत जमाती | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | १ |
| (४) | टंकलेखक (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.२०००) | | | | | | |
| | १) इतर मागास वर्ग | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | एकूण | १ | १ | ० | ० | ० | ० |
| (५) | कनिष्ठ सहाय्यक/सहाय्यक तथा टंकलेखक/विक्रेता तथा प्रयोग निर्देशक (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००) | | | | | | |
| | १) अनुसूचित जाती | १ | ० | १ | ० | ० | ० |
| | २) अनुसूचीत जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | ३) विशेष मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | ३ | १ | १ | ० | ० | १ |
| (६) | औद्योगिक पर्यवेक्षक (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००) | | | | | | |
| | १) अनुसूचीत जमाती | २ | १ | १ | ० | ० | ० |
| | एकूण | २ | १ | १ | ० | ० | ० |
| (७) | क्षेत्रिक (मध) (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००) | | | | | | |
| | १) विशेष मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | १ |
| (८) | सचिव (कारोहयो) (गट - क) (वेतन संरचना रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००) | | | | | | |
| | १) इतर मागास वर्ग | २ | ० | १ | ० | १ | ० |
| | एकूण | २ | ० | १ | ० | १ | ० |
| (९) | शिपाई/माळी तथा रखवालदार/पहारेकरी (गट - ड) (वेतन संरचना रु.४४४०-७४४० ग्रेड पे रु.१३००) | | | | | | |
| | १) अनुसूचीत जमाती | १ | ० | १ | ० | ० | ० |
| | २) विमुक्त जाती-अ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | ३) भटक्या जमाती -ब | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | ४) भटक्या जमाती -क | २ | १ | १ | ० | ० | ० |
| | एकूण | ५ | २ | २ | ० | ० | १ |
| (१०) | सहाय्यक सचिव (कारोहयो) (गट - ड) (वेतन संरचना रु.४४४०-७४४० ग्रेड पे रु.१३००) | | | | | | |
| | १) भटक्या जमाती -ब | १ | ० | १ | ० | ० | ० |
| | २) इतर मागास वर्ग | १० | ० | ६ | १ | ३ | ० |
| | एकूण | ११ | ० | ७ | १ | ३ | ० |

वरील पदांसाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव खालीलप्रमाणे आवश्यक आहे. (अर्ज करतेवेळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे) :-

(१) सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी/ सहाय्यक लेखा व लेखा परिक्षण अधिकारी/जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी

उमेदवार पदवीधर किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच प्रशासन/बँकिंग/शासकिय लेखा परिक्षण/ ग्रामोद्योग या क्षेत्रातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे

(२) लघुलेखक

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा तसेच उमेदवाराने (१) इंग्रजी लघुलेखन गती प्र.मि. १०० शब्द व टंकलेखन गती प्र.मि.४० शब्द शासनमान्य पदवीका परिक्षा उत्तीर्ण (२) मराठी लघुलेखन गती प्र.मि. ८० शब्द व टंकलेखन गती प्र.मि. ३० शब्द शासनमान्य पदवीका परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे

३) लघुटंकलेखक

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा तसेच उमेदवाराने मराठी लघुलेखन गती प्र.मि. ६० शब्द व टंकलेखन गती प्र.मि.श.३० (शासनमान्य पदवीका परिक्षा उत्तीर्ण) शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असावा. त्याचबरोबर इंग्रजी लघुलेखन गती प्र.मि. ८० शब्द व टंकलेखन गती प्र.मि.४० शब्द (शासनमान्य पदवीका परिक्षा उत्तीर्ण) असणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यांत येईल.

...२....

४) टंकलेखक

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा तसेच उमेदवाराने मराठी टंकलेखन गती प्रति मिनिट ३० शब्द व इंग्रजी टंकलेखन गती प्रति मिनिट ४० शब्द (शासनमान्य पदविका परिक्षा उर्तीर्ण) असणे आवश्यक आहे

५) कनिष्ठ सहाय्यक/सहाय्यक तथा टंकलेखक/विक्रेता तथा प्रयोग निर्देशक

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा तसेच उमेदवाराने मराठी टंकलेखन गती प्रति मिनिट ३० शब्द व इंग्रजी टंकलेखन गती प्रति मिनिट ४० शब्द (शासनमान्य पदविका परिक्षा उर्तीर्ण) असणे आवश्यक आहे

६) आद्योगिक पर्यवेक्षक

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच खादी व ग्रामोद्योगा अंतर्गत असलेल्या उदयोगातील प्रशिक्षित उमेंदवारांना प्राधान्य देण्यांत येईल

७) क्षेत्रिक (मध)

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. वनविभाग किंवा कृषी विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. तसेच मधव्यवसायाची माहिती असल्यास प्राधान्य

८) सचिव (कारोहयो)

उमेदवार एस.एस.सी.किवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असावा. तसेच लोअर डिल्पोमा इन को-ऑपरेशन परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य देण्यांत येईल

९) शिपाई/माळी तथा रखवालदार/पहारेकरी

उमेदवार ४ थी इयत्ता उत्तीर्ण व मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

१०) सहाय्यक सचिव (कारोहयो)

इयत्ता ४ थी पास किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण

वरील पदासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे नियम तसेच खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती अर्जदारावर बंधनकारक राहतील. वर नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज परिपूर्ण माहितीसह भरुन दिनांक १५/१०/२०११ पर्यंत वरील पत्त्यावर प्रमाणपत्रांच्या छायाप्रतीसह पाठवावा. मात्र मुलाखतीच्या वेळी सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्या लागतील.

## अटी व शर्ती

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

२. वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अहर्ता/अनुभव/जन्मदिनांक/सक्षम अधिकां-यानी प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र आणि जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या सक्षम अधिकांऱ्यानी प्रमाणित केलेल्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. नमुना अर्ज वेबसाईट **http://www.mskvib.org/category/advertisement/** किंवा **www.maharashtra.gov.in** वर उपलब्ध होईल. अर्जावर एक अलिकडच्या काळातील स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो स्वतःची स्वाक्षरी करुन अर्जावर चिकटवावा.

३. रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केलेली असल्यास अद्यावत नोंदणी पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

४. सर्व पदाकरीता मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

५. वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दिनांक ३०/९/२०११ या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी आणि ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

कमाल वयोमर्यादा पुढीलप्रकरणी शिथिलक्षम असेल :-

१) संरक्षण दलात ६ महिन्यापेक्षा जास्त सलग सेवा केलेल्या माजी सैनिकांकरिता सरक्षण दलातील सेवा अधिक ३ वर्षे अशी कमाल वयोमर्यादा राहील.

२) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त यांच्या नामनिर्देशीत उमेदवारास वयाची मर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

६. शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.४७/मावक-५ दिनांक २६ मार्च २०१० अन्वये मागासवर्गीय उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. आरक्षित पदासाठी निवड झाल्यास जात वैधता प्रमाणपत्र विहीत कालावधीत सादर केले नाही तर नेमणूक आदेश निर्गमित केले जाणार नाही.

७. समांतर आरक्षण 'माजीसैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त' या प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी त्याबाबतचा सक्षम प्रधिका-याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित सत्यप्रत अर्जासोब सादर करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनाव्दारे शासनाने पारीत केले आहे. या नियमातील तरतुदी सर्व उमेदवारांना बंधनकारक असतील. दोनपेक्षा जास्त अपत्य हयात असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

९. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्रक्र.६१/२००१/३९ दि.१९ मार्च २००३ नुसार उपरोक्त पदाकरीता अर्ज करणाऱ्यां उमेदवांरानी संगणक हाताळणे/वापराबाबतचे/D.O.E.A.C.C./सोसायटीच्या अधिकृत C.C.C. स्तर O. किंवा A. स्तर B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उर्तीर्ण झाल्याचे किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ,मबंई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उर्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असावा. सदरचे प्रमाणपत्र नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या आत प्राप्त करणे अनिवार्य राहील अन्यथा उमेदवारास नेमणूक मिळाली तरी ती संपुष्टात आणली जाईल.

१०. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू ठरेल.

११. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व. व वि.मा.प्र. यांच्यासाठी आरक्षण नियम २००१ सन २००४ चा अधिनियम क्र.८ हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९/०१/२००४ पासून अमलात आणला आहे.या अधिनियमातील तरतुदीनुसार उन्नत व प्रगत गटाचे क्रिमिलेयर तत्व अनूसूचित जाती व अनूसूचित जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गाना लागू असेल, अशी तरतूद केलेली आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे क्रिमिलेअर तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व. व वि.मा.प्र. यांना लागू आहे.

१२. शासकीय नियमाप्रमाणे मुलाखतीकरिता हजर राहणा-या पात्र मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांचे निवासी ठिकाण ते मुलाखतीचे स्थळ या दरम्यान जवळच्या मार्गाने प्रवास केलेली तिकिटे/तिकिटाच्या छायाप्रती सादर केल्यास त्यांना प्रवास भाड्याची प्रतिपूर्ती करण्यांत येईल.

१३. परिक्षेचा प्रकार/पदांची संख्या याबाबत अशंतः बदल करणे, परिक्षा स्थगित करणे, रद्द करणे, पुढे ढकलणे, प्रकिंया रद्द ठरविणे इत्यादीबाबतचे सर्व अधिकार मंडळाने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

१४. निवड प्रक्रीयेमध्ये लेखी चाचणी किंवा तोंडी मुलाखत समाविष्ट असेल ही चाचणी वस्तुःनिष्ट स्वरुपाची असून त्यामध्ये सामान्य बुध्दिमत्ता, सांख्यिकीय अभियोग्यता, सामान्य ज्ञान इ.वर आधारित प्रश्न असतील, परिक्षेचे स्वरुप अधिक तपशीलासह परिक्षेसाठी बोलविण्यांत येणा-या पत्राबरोबर (कॉल लेटर) पाठविण्यांत येईल.

१५. जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे पात्रताधारक असल्याची खात्री करुनच उमेदवारांनी अर्ज करावे. अपुर्ण भरलेले तसेच अर्हतेची प्रमाणपत्रे न जोडलेले अर्ज रद्द समजण्यांत येतील. तसेच अर्जात चुकीची अथवा अपूर्ण माहिती असल्यास व अयोग्य पात्रताधारक असल्याचे आढळून आल्यास त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

१६. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाले नाहीत किंवा उशीरा प्राप्त झाले तर असे अर्ज विचारात घेतले जाणार नाही. तसेच टपालखात्याच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी मंडळावर रहाणार नाही. कुरीअर सेवेने प्राप्त होणा-या अर्जांना पावती दिली जाणार नाही. याच जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील यापुर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१७. उमेदवाराची निवड झाल्यास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात त्यांची नियुक्ती करण्यांत येईल.

१८. मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्यादृष्टीने विशेष मोहिमेअंतर्गत सदर नियुक्ती ही प्रथम दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर तात्पुरत्या स्वरुपात असेल. त्यांनी परिविक्षा कालावधीमध्ये विहित खाते परिक्षा, विहीत संगणक परिक्षा पास न केल्यास त्यांचा परिविक्षा कालावधी आणखी एक वर्षासाठी वाढविण्यात येईल. त्यानंतर उपरोक्त बाबींची पुर्तता न केल्यास त्यांना मंडळाच्या सेवेतून कमी करण्यांत येईल.

१९. उमेदवारांनी नियुक्तीसाठी अवैध मार्गाचा अवलंब केल्यास त्यांचा अर्ज रद्द करण्यांत येईल.

२०. उमेदवारांच्या निवडीसंबंधी मंडळाचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबत कोणतेही निवेदन अथवा अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

मुख्य कार्यकारी अधिकारी